Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 07 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात शून्य पूर्णांक २५ टक्क्यांची कपात केली आहे. मुंबईत बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. यामुळे आता रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्क्यांवरुन सहा पूर्णांक २५ टक्के इतका झाला आहे. यामुळे व्याजदरात कपात होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

तीन नवीन फौजदारी कायद्यांविषयी लोकांना माहिती देण्यासाठी प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात डिजिटल प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम, हे भारताच्या न्यायव्यवस्थेतील ऐतिहासिक बदलाचं प्रतिनिधित्व करणारे कायदे गेल्या वर्षी एक जुलै पासून देशभरात लागू करण्यात आले. काही कलाकार पथनाट्याच्या माध्यमातून लोकांमध्ये त्यांचे हक्क आणि या कायद्यांबाबत जागरुकता निर्माण करत आहेत.

****

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात देशभरात २५ कोटींहून अधिक रोजगारनिर्मिती झाल्याची माहिती, राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. उत्पादन क्षेत्रात सात कोटींहून अधिक जणांना रोजगार मिळाला असून, सेवा क्षेत्रात हीच संख्या १७ कोटी इतकी आहे, असंही त्यांनी सांगितलं.

****

विकसित भारताचं पंचप्राण ध्येय साध्य करण्यासाठी महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणं गरजेचं असून, या क्षेत्रात शतावरी ही वनस्पती महत्त्वाची भूमिका बजावेल, असं प्रतिपादन आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. शतावरी – उत्तम

आरोग्यासाठी या देशव्यापी मोहीमेला काल जाधव यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते.

****

नवीन प्राप्तीकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार असून, विधेयकाचा मसुदा आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर होण्याची शक्यता असल्याचं केंद्रीय अर्थसचिव तुहीन कांत पांडे यांनी सांगितलं. नवी दिल्लीत एका व्यापारी संघटनेनं आयेजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. नवीन विधेयकात धोरणात्मक बदल फारसे नाहीत, मात्र लांबलचक वाक्य आणि क्लिष्ट रचना टाळून सर्वांना समजेल अशी सोपी भाषा वापरली आहे, असं ते म्हणाले. हे विधेयक मंजूर झाल्यावर १९६१च्या प्राप्तीकर कायद्याची जागा घेईल.

****

शेतकरी-कष्टकऱ्यांच्या व्यथा मांडताना साहित्यिकांनी समाज प्रबोधनावर भर द्यावा, असं आवाहन विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी केलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेड इथं काल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल शिंदे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. ग्रामीण जीवनाचं वास्तव मांडणाऱ्या साहित्य निर्मितीमुळे समकालीन सामाजिक प्रश्न, लोकजीवन, लोकसंस्कृती, निसर्गसौंदर्य, शेतीचे प्रश्न समाजासमोर येतात. साहित्यातून समाजजीवन प्रतिबिंबित होते आणि मानवी जीवनाला दिशा मिळते, असं ते म्हणाले.

****

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल विजया रहाटकर यांचा काल नाशिक इथं श्री रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी आणि आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडला. गावाची, देशाची संस्कृती टिकवण्याचं कार्य महिलांनीच केलं, मात्र, सध्या विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था अडचणीत असून त्या सांभाळण्याची जबाबदारी केवळ महिलांचीच नाही, तर पुरुषांचंही तितकंच योगदान आवश्यक असल्याचं मत, रहाटकर यांनी व्यक्त केलं.

****

सरकारी संस्था संपवण्याचं विद्यमान सरकारचं उद्दीष्ट असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मुंबईत काल रेल्वे कामगार सेनेच्या वार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसला नाही तर आम्ही शिवसेनेच्या वतीने हा पुतळा बसवू, असा इशारा त्यांनी यवेळी दिला. रेल्वेचा वेगळा अर्थसंकल्प सादर होत नसल्याबद्दलही त्यांनी भाजप सरकारवर टीका केली.

****

खूनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला पण पॅरोल रजेवर बाहेर आलेला आणि फरार झालेल्या आरोपीला सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांच्या दोन साथीदारासह अटक केली. त्याच्याकडून चार पिस्टल आणि २४ जिवंत काडतुसं जप्त करण्यात आली.

****

परभणी जिल्ह्यातल्या धार्मापुरी इथल्या ज्ञानसाधना कॉलेज ऑफ फार्मसी आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा आणि वाहतुकीचे नियम याबाबत काल कार्यशाळा घेण्यात आली. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष पराशर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

****

जागतिक महिला दिनानिमित्त येत्या आठ मार्चला बीड इथं तुलसी शैक्षणिक समुहाच्या वतीनं महिला मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. पाच किलोमीटर अंतर असलेल्या या मॅरेथॉनमधल्या विजेत्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

****